# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**महोदय/महोदया,**

केरळ राज्यात थैमान घालणाऱ्या पावसामुळे उद्भलेल्या नैसर्गिक आपत्तीग्रस्त नागरीकांना मदत म्हणून राज्यातील सर्व भा.प्र.से., भा.व.से व महाराष्ट्र राज्य शासनाचे सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या माहे सप्टेंबर, २०१८ च्या वेतनातील एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये देणगी म्हणून उपलब्ध करून देण्याबाबत शासन परिपत्रक संकीर्ण-१११८/प्र.क्र. ३७८/१६-अ दि.२७/०५/२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे. याअनुषंगाने आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, याबाबत आपल्या महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, तसेच विद्यार्थी यांचेकडून कीती रक्कमेचा निधी संकलित केला अथवा देण्यात आला याची माहिती तात्काळ या कार्यलयास सादर करावी.

आदेशान्वये

उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

संदर्भ क्र. संलग्नता टी-२/ 153
दिनांक- 19 OCT 2018

केरळ राज्यात पावसामुळे उद्भावलेल्या नैसर्गिक आपत्तीग्रस्त नागरिकांना मदत म्हणून राज्यातील सर्व भा.प्र.से.,भा.पो.से.,भा.व.से व महाराष्ट्र राज्य शासनाचे सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या माहे सप्टेंबर, २०१८ च्या वेतनातील एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये देणगी म्हणून उपलब्ध करुन देण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग

**शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-१११८/प्र.क्र.३७८/१६-अ.**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २७ ऑगस्ट, २०१८.

प्रस्तावना -

केरळ राज्यात थैमान घालणाऱ्या पावसामुळे आतापर्यंत अनेक नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. तसेच अनेक लोक बेघर झाले आहेत. ही राष्ट्रीय आपत्ती असून त्यासाठी सर्व स्तरावरुन मदतीचा ओघ सुरु आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या प्राणहानी व वित्तहानी भरुन काढण्यासाठी मोठया प्रमाणात आर्थिक पाठबळाची आवश्यकता लागणार आहे. राज्य शासनाकडूनही मदतकार्यासाठी पुढाकार घेण्यात आला असून मा.मंत्री, जलसंपदा व वैद्यकीय शिक्षण यांच्या नेतृत्वाखाली डॉक्टरांच्या पथक व विविध साहित्यासह मदतीसाठी तात्काळ केरळ राज्यात दाखल होवून मदतीचे कार्य सुरु केले आहे. सदर आवाहनाला मानवतेच्या दृष्टीकोनातून मदतकार्यासाठी प्रतिसाद म्हणून, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र आणि जिल्हा परिषद कर्मचारी युनियन यांनी कर्तव्यबुध्दीने राज्यातील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या ऑगस्ट २०१८ च्या पगारातून एक दिवसाचा पगार या मदतकार्यासाठी परस्पर कापून घ्यावा, असा प्रस्ताव शासनाला दिला आहे. तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनीही केरळ राज्याच्या आपत्तीसाठी त्यांच्या निवृत्तीवेतनातून एक दिवसाच्या वेतनाची रक्कम देण्याचे दूरध्वनीद्वारे सांगितले आहे. केरळ राज्यातील आपत्तीचे भीषण स्वरुप पाहता, राज्य शासनाच्या वतीने सुरु असलेल्या सदर राहतकार्यासाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून अधिक रक्कम देता यावी यास्तव आता राज्याचे मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री, मा. राज्यमंत्री, मा. विधानसभा सदस्य, मा. विधानपरिषद सदस्य, राज्यातील सर्व भा.प्र.से., भा.पो.से., भा.व.से व अन्य अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून एक दिवसाचे एकूण वेतनाइतकी रक्कम माहे सप्टेंबर, २०१८ च्या वेतनातून वसूल करण्यात यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

परिपत्रक -

केरळ राज्यात पावसामुळे उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीस सामोरे जाण्यासाठी सहाय्य व मदत व पुनर्वसनाच्या कामास आपलाही हातभार लागावा म्हणून राज्याचे मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री, मा. राज्यमंत्री, मा. विधानसभा सदस्य, मा. विधानपरिषद सदस्य, राज्यातील सर्व भा.प्र.से., भा.पो.से., भा.व.से व राज्य शासनाचे सर्व अधिकारी/कर्मचारी यांचा सहभाग असावा

या हेतूने त्यांना माहे सप्टेंबर २०१८ च्या आपल्या वेतनातील प्रत्येकी १ दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये देण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

२. राज्य शासनातील सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका/ नगरपरिषद, सार्वजनिक उपक्रमे, महामंडळे, मंडळे तसेच सर्व स्वायत्त संस्थेचे विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी सदर परिपत्रक आपल्या विभागातील/कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून दयावे व त्यांना प्रश्नाचे गांभीर्य समजावून सांगावे आणि एक दिवसाचे वेतन सप्टेंबर, २०१८ च्या वेतनातून कापावे.

ज्या अधिकारी / कर्मचाऱ्याची मासिक वेतनातून रक्कम वसूल करण्यास हरकत असेल त्यांनी त्या आशयाचे वैयक्तिक पत्र संबंधित कार्यालयाच्या आस्थापना अधिकाऱ्यांकडे द्यावे. अशा अधिकारी /कर्मचारी यांचे वेतनातून कपात करु नये.

तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या संघटनेने केरळ पूरग्रस्तांसाठी त्यांच्या निवृत्तीवेतनातून एक दिवसाचे निवृत्तीवेतन देण्याची इच्छा व्यक्त केली असून अशा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांनी त्यांची एक दिवसाच्या पगाराची ऐच्छिक कपात करण्याबाबत संबंधीत कोषागार कार्यालयास कळवावे.

४. एक दिवसाचे वेतन (माहे सप्टेंबर २०१८) कपातीसाठी व ती रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये जमा करण्यासाठी व त्याचा हिशोब सादर करण्यासाठी खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा:-

(एक) माहे सप्टेंबर २०१८ या महिन्याचे वेतन देयके संपूर्ण रकमेचे काढण्यात यावे. तथापि, वेतनातील नियमित वजातीनंतर व एक दिवसाच्या वेतनाच्या वजातीनंतर वेतनाची उर्वरीत रक्कम संबंधित अधिकारी यांना धनादेश/रोखीने/ विहित पध्दतीने अदा करण्यात यावी.

सध्या ज्या अधिकारी यांचे वेतन त्यांनी शासनास उपलब्ध करुन दिलेल्या त्यांच्या बँक खात्याच्या तपशिलानुसार खात्यावर परस्पर जमा करण्यात येते अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनातील नियमित वजातीनंतर उर्वरित वेतनाची रक्कम संबंधित बँकेकडे जमा करण्यापूर्वी सदर रकमेतून सप्टेंबर २०१८ मधील वेतनातून १ दिवसाचे वेतन कमी करुन शिल्लक रक्कम त्यांच्या खात्यावर जमा करण्याचे कळविण्यात यावे.

(दोन) सदर १ दिवसाचे वेतन कपात करताना ते मूळ वेतन+ग्रेड पे+महागाई भत्ता यांच्या एकूण रकमेच्या आधारे गणना करुन कपात करण्यात यावे.

(तीन) वेतन वितरणाच्या वेळी वरीलप्रमाणे वसुली करुन वसूल केलेल्या रकमेची नोंद घेण्यासाठी (माहे सप्टेंबर २०१८ करिता) एक स्वतंत्र नोंदवही ठेऊन त्यामध्ये वसूल केलेल्या रकमांची नोंद कर्मचारीनिहाय घेण्यात यावी.

(चार) अशाप्रकारे मुख्यमंत्री सहायता निधीसाठी एकत्रित होणारी रक्कम विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख तसेच जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी/ मुख्य अधिकारी, नगरपरिषद/ नगरपालिका, आयुक्त, महानगरपालिका यांनी मुख्यमंत्री सहायता निधी यांची वेबसाईट www.cmrf.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर भरणा करुन त्या ठिकाणी तयार होणा-या पोचपावतीची प्रत मुद्रीत करुन घ्यावी किंवा खाली नमूद केलेल्या तपशीलाप्रमाणे मुख्यमंत्री सहायता निधी बँक खात्यात परस्पर जमा करावी व त्याची पोचपावती, गोळा केलेल्या रकमेच्या देणगीदारांच्या यादीसह दोन प्रतीत परस्पर मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, मुख्यमंत्री सचिवालय, ६ वा माळा, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांच्याकडे निश्चित प्राप्त होईल अशा प्रकारे रकमेचा भरणा केल्याच्या दिनांकापासून ७ दिवसाच्या आत अचूक पाठवावी.

<u>मुख्यमंत्री सहायता निधी बँक खात्याचा तपशील</u>-

| | |
|---|---|
| मुख्यमंत्री केरळ पुरग्रस्त सहायता निधी,<br>बँक ऑफ महाराष्ट्र,<br>बचत खाते क्रमांक ६०३१२९७८१४९<br>मंत्रालय शाखा, मुंबई - ३२.<br>IFS Code : MAHB०००१३८८<br>MICR Code : ४०००१४०६९ | Chief Minister Kerala Flood Relief Fund<br>Bank of Maharashtra,<br>Saving Account No. 60312978149<br>Mantralaya Branch, Mumbai - 32.<br>IFS Code : MAHB0001388<br>MICR Code : 400014069 |

( <u>टिप</u>:- मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडून बँक खात्यात जमा होणा-या देणगी रकमांबाबत नोंद घेणे, इ. कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे सामान्य प्रशासन विभाग, कार्या.१६-अ कडे सदर धनादेश/धनाकर्ष, देणगीदारांची यादी, इ. माहिती पाठविण्याची आवश्यकता नाही.)

(पाच) शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन वाटप करतांना त्यांच्याकडून वसूल करावयाच्या वेतनाइतक्या रकमेचे प्रमाणपत्र तयार ठेवण्यात यावे. सदर प्रमाणपत्र विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख अथवा संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांच्या स्वाक्षरीने संबंधितांना देण्यात यावे. त्यामुळे मुख्यमंत्री सहायता निधीतून परत वेगळ्या व्यक्तिगत पावतीची व प्रमाणपत्राची आवश्यकता राहणार नाही. वेतन वाटप करीत असतानाच या परिपत्रकासोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र त्यांना देण्यात यावे.

(सहा) बृहन्मुंबईतील मंत्रालयीन विभाग व अन्य विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख इत्यादींनी गोळा केलेला निधीचा धनादेश, देणगीदारांच्या यादीसह (दोन प्रती) परस्पर मुख्यमंत्री सचिवालयातील मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष यांच्याकडे समक्ष पाठवून त्याबद्दलची पोचपावती घ्यावी.

(सात) जिल्हास्तरावर जनतेकडून व विविध संस्थांकडून जमा होणारी रक्कम विभाग/ कार्यालय प्रमुखांनी संबंधित देणगीदारांच्या यादीसह (दोन प्रती) त्या त्या जिल्हाधिका-यांकडे सुपूर्द करावी. जिल्हाधिकारी यांनी त्यांच्याकडे धनादेशाव्दारे जमा झालेली रक्कम उपरोक्त सूचना क्रमांक (चार) मध्ये नमूद बँक खात्यात जमा करुन त्या संबंधातील पोचपावती व तपशिलासह मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडे उपरोक्त पत्त्यावर पाठवावी.

रोखीने प्राप्त झालेल्या रकमेच्या बाबतीत जिल्हाधिका-यांनी कार्यालयनिहाय यादी तयार करुन एकूण रकमेचा बँक ऑफ महाराष्ट्रचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये उपरोक्त अ.क्र. (चार) मध्ये नमूद कार्यपध्दतीप्रमाणेच जमा करुन त्याबाबत परिशिष्ट **'अ'** प्रमाणे प्रमाणपत्र संबंधितांना दयावे व अशा प्रकारे प्राप्त निधीच्या तपशीलासह माहिती नमुना **'ब'** व **'क'** मध्ये मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाकडे पाठवावी. अशा रकमेचा भरणा दर आठवडयाला अथवा ठराविक काळामध्ये करावा, तोपर्यंत ही रक्कम सोयीकरिता जिल्हास्तरावरील जिल्हाधिकारी यांच्याकडील मुख्यमंत्री निधीच्या बचत खात्यात सुरक्षित ठेवायला हरकत नाही. मात्र त्याचा हिशोब वेगळा ठेवावा.

(आठ) विभाग प्रमुख / जिल्हाधिकारी / कार्यालय प्रमुख यांनी माहे सप्टेंबर २०१८ च्या पगारातून संबंधितांचे एक दिवसाचे वेतन कपातीबाबत व्यक्तीशः लक्ष घालून कपातीची कार्यवाही करावी व तात्काळ मा. मुख्यमंत्री सहायता निधीस रक्कम जमा करावी.

(नऊ) एक दिवसाच्या एकूण वेतनाइतक्या रकमेपेक्षा कमी रक्कम कापून घेण्यास परवानगी देण्यात येऊ नये.

५. मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष यांनी उपरोक्त परि.४ (सहा) व (सात) मध्ये उल्लेख केलेल्या देणग्या स्वीकारुन/प्राप्त झाल्याची खातरजमा करुन संबंधितांना एकत्रित पोचपावती तात्काळ देण्याची व्यवस्था करावी.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१८०८२७१६३९३७२१०७ आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHIVAJI RAGHUNATH DAUND

Digitally signed by SHIVAJI RAGHUNATH DAUND
DN: c=IN, o=Personal,
2.5.4.20=cace7d2ca64c6e6543e03a796c1b05a4c28b727e17119c6a62359e3a9136b4be, postalCode=400603, st=MAHARASHTRA,
serialNumber=e08a9964fa88914fd0b0956696c822b221982cc926ec215f4b3ec3db9582d97c, cn=SHIVAJI RAGHUNATH DAUND
Date: 2018.08.27 16:49:46 +05'30'

**(शिवाजी दौंड)**
सचिव (सा.वि.स.), सामान्य प्रशासन विभाग.
महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधानपरिषद/विधानसभा व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
३. मा. राज्यपालांचे सचिव, मलबार हिल, राजभवन, मुंबई-४०० ०३५.
४. मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. सर्व मा. मंत्री /मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद), विधानभवन, मुंबई-४०० ०३२.
९. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान सभा), विधानभवन, मुंबई-४०० ०३२.

१०.सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई- ४०० ०३२.
११.सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई-४०० ०३२.
१२.उप सचिव (आस्थापना) ,सर्व मंत्रालयीन विभाग
१३.सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी.
१४.प्रबंधक, उच्च न्यायालय ( मूळ न्याय शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१५.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१६.प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१७.प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१९. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मूळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
२०.सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
२१.महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई.
२२.महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर.
२३.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ (५ प्रती)
**त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन परिपत्रकास प्रसिध्दी देण्याबात आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.**
२४.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.
२५.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका.
२६.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२७.ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई (१० प्रती),
२८. राज्यातील सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक.
२९.सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य.
३०.निवड नस्ती, कार्या.१६-अ, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

*************

आयकर प्रमाणपत्राचा नमुना खालील प्रमाणे :-.

## परिशिष्ट-अ

## प्रमाणपत्राचा नमुना

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती/कुमारी............................ जे/जी................................ विभागात/कार्यालयात .........................पदावर कार्यरत / सेवानिवृत्त आहेत, त्यांनी "मुख्यमंत्री सहायता निधीसाठी "रु...................../- (अक्षरी रुपये.......................................... ) एवढी देणगी दिली असून ही देणगी आयकर अधिनियम, १९६१ कलम ८० (ग) (२) (तीन एच एफ) खाली १०० टक्के सुटीस पात्र आहे.

स्थळ: - विभागप्रमुख /कार्यालय प्रमुख /आहरण व संवितरण अधिकारी
दिनांक:- यांची सही व शिक्का

## परिशिष्ट-ब

मुख्यमंत्री सहायता निधी खात्यात जमा करण्यात येणा-या रकमांचा तपशील प्रमाणपत्राचा नमुना

कार्यालयाचे नाव व पत्ता :-

| अ. क्र. | आहरण व संवितरण अधिका-याचे नाव, पदनाम व संपूर्ण पत्ता | धनादेश/धनाकर्षाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | बँकेचे नाव व शाखा | क्रमांक | दिनांक | रक्कम (रुपये) |
| | | | | | |
| | | | | | |

सक्षम प्राधिका-याची सही व शिक्का

## परिशिष्ट-क

मुख्यमंत्री सहायता निधी खात्यात जमा करण्यात येणा-या रकमांचा तपशील
प्रमाणपत्राचा नमुना

जिल्हाधिकारी कार्यालय:-

| अ. क्र. | देणगीदाराचे पूर्ण नाव व संपूर्ण पत्ता | धनादेश/धनाकर्षाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | बँकेचे नाव व शाखा | क्रमांक | दिनांक | रक्कम (रुपये) |
| | | | | | |
| | | | | | |

सक्षम प्राधिका-याची सही व शिक्का

//-//-//